जीवनातील प्रत्येक क्षण संस्मरणीय - भीमसेन जोशी

प्रतिनिधी

पुणे, ४ फेब्रुवारी

कोणत्याही क्षेत्रातील कलाकार असो, पैशाचा लोभ न धरणे, प्रामाणिकपणा व गुरुवरील भक्ती या तीन गोष्टी असल्या की परमात्मा त्याला काही कमी पडू देत नाही, अशा शब्दांत संगीतातील सर्व घराण्यांचा संगम ठायी असलेले श्रेष्ठ गायक पंडित भीमसेन जोशी यांनी आज ८० व्या वाढदिवशी मनोगत व्यक्त केले.

पुण्याचेच नव्हे तर भारतीय संगीताचेच भूषण असलेल्या पंडितजींनी आज ८० वा वाढदिवस साजरा करून ८१ व्या वर्षात पदार्पण केले. त्यामुळे सकाळपासूनच त्यांचे घर येणाऱ्या आप्त, सुहृद, नातेवाईक व चाहत्यांमुळे आगमनाने फुलून गेले होते. पंडितजी येणाऱ्या प्रत्येकाशी काही ना काही बोलून त्याच्याशी संबंधित संदर्भ देत संवाद साधत होते. बोलताना प्रत्येक संवादात पंडितजींचा मिष्किलपणा प्रत्ययास येत होता आणि एरवी पंडितजींच्या गाण्याला माना डोलावत दाद देणारे आज त्यांच्या स्वभावाला, उमदेपणाला, मिष्किलपणाला दाद देत होते. प्रत्येकाला आवर्जून 'तोंड गोड करून घ्या', असे सांगून बर्फी व फराळ दिला जात आहे ना, याचीही चौकशी पंडितजी स्वत: करीत होते. सकाळपासून सुरू झालेला हा चाहत्यांचा ओघ सायंकाळनंतर खूपच वाढला होता आणि पंडितजींच्या घरात या साऱ्यांमुळे पाय ठेवायलाही जागा उरली नव्हती.

पंडितजींच्या पत्नी वत्सलाबाई यांच्यासह चिरंजीव जयंत, स्नुषा लक्ष्मी, नाती रेणुका व यशोदा, कन्या शुभदा व जामात अरविंद मुळगुंद, नातू अक्षय सर्व येणाऱ्यांचे स्वागत करून पंडितजींना नेहमीप्रमाणे साथ देत होते.

'दर्जा खालावू नका'

वाढदिवस प्रत्येक वर्षी येतंच असतंय, असे त्यांच्या खास शैलीत सांगून पंडितजी म्हणाले की, यंदाचा वाढदिवस विशेष आहे कारण वयाची ८० पूर्ण करून ८१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. नवी पिढी, जुनी पिढी असं काही मानत नाही आणि ज्यांच्या गळ्यात गाणं असतं त्यांना उत्तम म्हणतो आणि ते टिकतं. कलकत्त्यातले राशीद खाँ यांच्यासारखे चांगले गुणी गायक आश्वासक आहेत. कलावंताने स्वत:च्या नावाचा लौकीक टिकवायला हवा. तो टिकवणंच अवघड असतं. त्यामुळेच तर नेहमी सांगतो की, फार वरच्या दर्जाचं गाऊ नका पण किमान आहे तो दर्जा खालावू नका.

आजवरच्या वाटचालीत संस्मरणीय क्षण कोणता आहे, असे विचारले असता ते म्हणाले की, खरे तर जीवनातील प्रत्येक क्षणच संस्मरणीय आहे.

सर्व सत्पुरुषांचे आशीर्वाद, गुरूंचे आशीर्वाद आणि तिकीट काढून कार्यक्रमाला येणाऱ्या रसिकांचे तशा अर्थाने लाभदायक आशीर्वाद यामुळेच हे घडू शकले आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कलावंत मोठा होतो तो त्याच्या कुटुंबियांनी चांगली साथ दिल्यामुळेच. पत्नी वत्सला व मुलांनी उत्तेजन दिले, इतरांना वाटते तशी भीती न वाटता त्यांनी गाण्याबद्दल प्रतिक्रिया दिल्या आणि त्यामुळे गाणं सुधारत गेलं.

जीवनात सुखाच्या वा दु:खाच्या वेळी काही गुणगुणता का ? असे विचारले असता पंडित भीमसेन जोशी म्हणाले की, तसं एखादंच गाणं नाही पण जे काही चांगलं ऐकलेलं असेल ते गुणगुणतो. दोन-तीन दिवस असं ताजं ऐकलेलं गुणगुणतो आणि तेव्हा समोर कुणी नसतं, ते एक बरं असतं. घरात नेहमी गुणगुणतो त्यामध्ये आमीरखाँसाहेब, सिद्धेश्वरी देवी अशांचं गाणं ऐकतो व गुणगुणतोही.

चाहत्यांची रीघ

पंडितजींना शुभेच्छा देण्यासाठी आज सकाळपासूनच त्यांच्या घरी चाहत्यांची रीघ लागली होती. त्याबरोबर विविध क्षेत्रातील मान्यवरही पंडितजींना भेटण्यासाठी आवर्जून आले होते. पुण्याबाहेरील आप्त, सुहृदांनी दूरध्वनीद्वारे त्यांना शुभेच्छा दिल्या.

राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख, ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे, पंडित शिवकुमार शर्मा, पंडित बालमुरलीकृष्ण, ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर, सुनीताबाई देशपांडे, श्रीनिवास खळे, मंगेश पाडगावकर, लालजी देसाई, नाना पाटेकर यांनी पंडितजींना दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या तर खासदार सुरेश कलमाडी, उद्योगमंत्री पतंगराव कदम, साहित्य संमेलनाध्यक्ष राजेंद्र बनहट्टी, डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्यासह संगीत क्षेत्रातील ध्रुपद गायक सद्रुद्दीन डागर , सईद नफिसुद्दीन, सईद अनिसुद्दीन डागर, सत्यशील देशपांडे श्रीकांत देशपांडे, उदय चिपलकट्टी, रवी परांजपे, शौनक अभिषेकी आदींनीही पंडितजींना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या

मास्टर भगव

पान १ वरून ➤ बहादूर, जलन, मददगार,
स्टंटपटांची रांग लागली. 'भेदी बंगला' हा भ
चित्रपटांना सी. रामचंद्र यांनी अण्णा या नावान
आशय असलेल्या चित्रपटांकडे वळविला.

सामाजिक चित्रपटांच्या आशयातील 'अलबेल
जो भडके, भोली सुरत दिलके खोटे, धिरे से अ
त्यामधील गाण्यांची लोकप्रियता इतकी होती की
त्यानंतर आलेला 'झमेला' हा चित्रपट साफ अ
शोला जे भडके, सच्चेका बोलबाला, हम दिवाने
रामचंद्र आणि दादा यांच्यातील संबंध बिघडले
निर्मिती बंद केली.

दादांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री विलासरा
पदलालित्य आणि खट्याळ स्वभाव यामुळे ते रि
नृत्यशैली होती व त्या काळात त्या शैलीने अने
हसतमुख राहणाऱ्या आणि सर्वांना हसवत ठेवणा
शोकाकूल होणे स्वाभाविक आहे, असे मुख्यमंत्र्यां

उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी दादांच्या नि
व्यक्त केला आहे. दादांच्या भूमिका चित्रपटा
संवादफेकीच्या लकबीवर रसिक प्रेक्षक बेहद्द खूश
आबालवृद्धांना वेड लावणारे दादा काळाच्या पड
मोरे यांनी म्हटले आहे. त्यांची कारकीर्द ही चित्रप
आहे. रिपब्लिकन पक्षाचे नेते खासदार रामदास
दादांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले आहे.

भगवानदादा यांच्या आयुष्यातील अखेरचे दि
छोटयाशा खोलीत त्यांचे वास्तव्य होते. विनोदी
अभिनेत्याच्या भूमिका करू लागले त्यानंतर तर
त्यांच्यावर आली